RNI No. MAHBIL/2009/31733

Reg. No. MH/MR/South-322/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ४०] बुधवार, जुलै २५, २०१२/श्रावण ३, शके १९३४ [पृष्ठे १९

किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १०२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## विधी व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जुलै २०१२.

अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर.१०९८/२२२३/प्र.क्र. २६५(भाग-दोन)/का.-दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि याबाबत काढण्यात आलेले व राज्यामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व नियम व आदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागातील सहायक (विधी) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षेसाठी खालील नियम तयार करीत आहेत, जसे :—

१. **संक्षिप्त नाव प्रारंभ.—**

(१) या नियमांस "सहायक (विधी ) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नतीसाठी घेण्यात येणारी विभागीय परीक्षा नियम, २०१२ " असे संबोधण्यात यावे.

(२) हे नियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. **व्याख्या.—**

या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " अधीक्षक " म्हणजे विधी व न्याय विभागाच्या विधी शाखेतील अधीक्षक (विधी) ;

(ब) " परिशिष्ट " म्हणजे या नियमांचे परिशिष्ट ;

(क) " परीक्षा " म्हणजे नियम ११ व परिश्ष्ट " अ " व " ब " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमानुसार सहायक (विधी) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणारी विभागीय परीक्षा ;

(ड) " विभाग " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभाग ;

(इ) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ई) " सध्या अस्तित्वात असलेले नियम " म्हणजे हे नियम अंमलात आल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी सहायक (विधी) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षेकरिता अंमलात असलेले नियम व आदेश ;

(फ) " सहायक (विधी) " म्हणजे विधी व न्याय विभागाच्या विधी शाखेतील सहायक (विधी).

३. **पात्रता.—**

परीक्षेला बसण्यास पात्र होण्यासाठी सहायक (विधी) याने सहायक (विधी) या पदासाठी विहित केलेली सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्याने सहायक (विधी) म्हणून ५ वर्षांची अखंड सेवा पूर्ण केलेली असली पाहिजे.

४. **कालावधी व संधींची संख्या.—**

(१) नियम ३ च्या तरतुदीस अधीन राहून, प्रत्येक सहायक (विधी) याने त्याच्या सहायक (वि[illegible]) म्हणून ९ वर्षांच्या अखंड सेवेमध्ये आणि तीन संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(२) सध्या अस्तित्वात असलेल्या नियमांनुसार एखाद्या संधीचा लाभ यापूर्वी घेतलेला असेल तर ती संधी या नियमांनुसार घेण्यात येणा-या एकूण संधींमध्ये मोजण्यात येईल :

परंतु, जो सहायक (विधी) (१) अनुसूचित जाती, (२) अनुसूचित जमाती व (३) विमुक्त जाती(अ) तसेच भटक्या जमाती (ब, क व ड) या प्रवर्गातील असेल त्याला सहायक (विधी ) म्हणून झालेल्या त्याच्या १० वर्षांच्या अखंड सेवेमध्ये आणि चार संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होण्याची मुभा दिली जाईल.

५. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम.—**

सहायक (विधी) नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर त्याच्यापूर्वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व सहायक (विधी) यांच्या बरोबरची त्यांची अधीक्षकाच्या पदावर पदोन्नती देण्यासाठीची ज्येष्ठता त्याला गमवावी लागेल. तसेच, अशा ज्या सहायक (विधी) नंतरचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल त्या सहायक (विधी) यांना ज्येष्ठ असणारे आणि त्यांच्यानंतर, परंतु नियम ४ मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणारे सहायक (विधी) देखील त्याला ज्येष्ठ होतील आणि त्यांच्याखाली त्यांची ज्येष्ठता लागेल.

६. **परीक्षा केव्हा घेण्यात येईल.—**

सर्वसाधारणतः परीक्षा मराठीमध्ये किंवा इंग्रजीमध्ये किंवा दोन्ही भाषांमध्ये प्रत्येक वर्षी नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये सामान्य प्रशासन विभागामार्फत कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेसमवेत घेण्यात येईल.

७. **परीक्षा घेण्यात न आल्यास त्याचे होणारे परिणाम.—**

जर, कोणत्याही कारणावरून, कोणत्याही वर्षी परीक्षा घेण्यात आली नाही तर ते वर्ष नियम ४ मध्ये विहित केलेला कालावधी मोजताना वगळण्यात येईल.

८. **परीक्षेला बसण्यासाठी संधी.—**

नियम ५ मधील तरतुदीस अधीन राहून, सहायक (विधी) यास परीक्षेस बसण्यासाठी कितीही वेळा संधी मिळू शकेल.

९. **अधीक्षकांची नियुक्ती.—**

मंत्रालय दुय्यम सेवेमधील कोणत्याही सहायक (विधी) याची तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय किंवा नियम १० अन्वये त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तशी सूट दिलेली असल्याशिवाय अधीक्षक या पदावर नियुक्ती करण्यात येणार नाही.

१०. **सूट.—**

खालील व्यक्तींना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल,—

(अ) सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण झालेले सहायक (विधी),

(ब) सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये ज्यांना यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आलेली आहे, ते सहायक (विधी),

(क) नियम ३ च्या तरतुदी अन्वये परीक्षेला बसण्यासाठी पात्र असलेले आणि, हे नियम अंमलात आल्याच्या दिनांकास किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिवशी ४५ वर्षे इतके वय झालेले सहायक (विधी), मात्र नियम ५ च्या तरतुदी अन्वये त्यांनी गमावलेली ज्येष्ठता त्यांना पुन्हा मिळणार नाही.

११. **पाठ्यक्रम.—**

(१) परीक्षा खालीलप्रमाणे दोन भागांमध्ये घेण्यात येईल,—

भाग एक-सामान्य प्रशासन विभागाकडून कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेचे सर्व समान विषय, आणि

भाग दोन-विभागाच्या विधीविषयक कामकाजासंबंधीचे विशिष्ट विषय.

(२) परीक्षेसाठी भाग-एकचा पाठ्यक्रम, कालावधी, प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे कमाल गुण परिशिष्ट " अ " मध्ये दर्शविल्याप्रमाणे किंवा शासन वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे इतर विषय असतील.

(३) परीक्षेसाठी भाग-२ मध्ये विभागाच्या विशिष्ट विषयांशी संबंधित प्रत्येकी १०० गुणांच्या तीन प्रश्नपत्रिका असतील. भाग-दोन चा पाठ्यक्रम, कालावधी, प्रत्येक प्रश्नपत्रिकेचे कमाल गुण परिशिष्ट " ब " मध्ये दर्शविल्याप्रमाणे किंवा शासन वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे इतर विषय असतील.

(४) भाग एक मधील परीक्षा घेण्याची व्यवस्था सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येईल व भाग दोन मधील परीक्षा घेण्याची व्यवस्था विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशनानुसार करण्यात येईल. अंतिम निकाल सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहीर करण्यात येईल आणि विभागाला कळविण्यात येईल.

१२. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक.—**

परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे मानक असेल.

१३. **अनुग्रह गुण.—**

संपूर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या एकूण गुणांच्या ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळविले असतील, परंतु कमाल दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकेमध्ये ५० टक्के गुण तो मिळवू शकला नसेल तर त्याला त्या विषयामध्ये जास्तीत जास्त ७ अनुग्रह गुण, जर त्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापूर्वीच्या प्रयत्नामध्ये सूट देण्यात आलेली आहे, त्यांनादेखील ही सवलत देण्यात येईल.

१४. **विशेष गुणवत्ता.—**

जो सहायक (विधी), पहिल्या प्रयत्नामध्ये परीक्षा उत्तीर्ण होईल आणि कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळविल त्याच्या त्या प्रश्नपत्रिकेमधील विशेष गुणवत्तेची नोंद त्याच्या गोपनीय अहवालामध्ये घेण्यात येईल.

१५. **विषयांमध्ये सूट.—**

जो सहायक (विधी), परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेला आहे, परंतु ज्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेमध्ये ५५ टक्के किंवा अधिक गुण मिळविलेले आहेत, त्याला त्यानंतरच्या प्रयत्नांमध्ये त्या विषयासाठी परीक्षेला बसण्यातून व उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येईल.

१६. **परीक्षेला बसण्यासाठी अर्ज.—**

एखाद्या वर्षामध्ये घेण्यात येणा-या परीक्षेला बसण्याची सहायक (विधी) ची इच्छा असेल तर, तो परिशिष्ट " क " मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांच्यामार्फत सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे त्या वर्षाच्या १ ऑगस्टपूर्वी लेखी अर्ज करील.

## परिशिष्ट —" अ "

[नियम ११ (२) पहा]

विधी व न्याय विभागातील सहायक (विधी) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षा यासाठीचा पाठ्यक्रम.

| प्रश्नपत्रिका क्रमांक (१) | विषय (२) | प्रश्नपत्रिकेचा कालावधी (३) | गुण (४) |
|---|---|---|---|
| एक | (अ) भारताचे संविधान .. .. .. | ३ तास | १०० |
| | (ब) विधानमंडळ नियमपुस्तिका व नियम | | |
| | (क) महाराष्ट्र लोकसेवा आयोग नियम व विनियम | | |
| दोन | (अ) वर्तणूक, शिस्त व अपील नियम आणि विभागीय चौकशी नियमपुस्तिका. .. | ३ तास | १०० |
| | (ब) सेवाप्रवेश नियम | | |
| | (क) टिप्पणी लेखन व मसुदा लेखन | | |
| तीन | (अ) महाराष्ट्र नागरी सेवा नियम .. .. .. | ३ तास | १०० |
| | (ब) अर्थसंकल्प नियम पुस्तिका | | |
| | (क) मुंबई वित्तीय नियम, १९६९ [प्रकरण-एक, दोन, सात, नऊ, अकरा व बारा बाब (सात) वगळून]. | | |
| | (ड) मुंबई आकस्मिक खर्च नियम, १९५९ [ कलम, नऊ, दहा, बारा, तेरा, चौदा, अठरा (एक)(पाच)(नऊ)(दहा), वीस (एक), एकवीस, पंचवीस, सव्वीस(एक) आणि (तीन), अठ्ठावीस, तीस, एकतीस, बत्तीस आणि तेहतीस वगळून]. | | |
| चार | (अ) सचिवालयीन अनुदेश .. .. .. | ३ तास | १०० |
| | (ब) महाराष्ट्र शासन कार्यनियमावली (पहिली अनुसूची वगळून) | | |
| | (क) कार्यनियमावली अन्वयेचे अनुदेश | | |
| | (ड) कार्यालयीन कार्यपद्धतीची नियमपुस्तिका | | |
| | (इ) वर्गीकृत माहिती व कागदपत्रे याबाबत घ्यावयाची खबरदारी आणि मांडणी याबाबत नियम. | | |

प्रश्नपत्रिका-एक, दोन (टिप्पणी लेखन व मसुदा लेखन वगळता) व तीन मधील विषयांचीच पुस्तके परीक्षेच्या वेळी वापरण्यास परवानगी राहील.

## परिशिष्ट —" ब "

[नियम ११ (३) पहा]

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यामधील " सहायक (विधी) " संवर्गाच्या " अधीक्षक (विधी) " पदावरील पदोन्नतीकरिता असलेल्या विभागीय परीक्षेच्या पाठ्यक्रमचा उतारा.

| प्रश्नपत्रिकेचा क्रमांक | विषय | प्रश्नपत्रिकेचा कालावधी | गुण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| प्रश्नपत्रिका एक | संविधीची अर्थउकल आणि संविधान .. .. | ३ तास | १०० |
| | विभाग १.—संविधीची अर्थउकल | | |
| | विभाग २.—भारताचे संविधान | | |
| | विभाग ३.—अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्या संविधानांचा तुलनात्मक अभ्यास. | | |
| प्रश्नपत्रिका दोन | विशेष कायदे .. .. .. | ३ तास | १०० |
| | विभाग १.—(अ) राज्य अधिनियम | | |
| | (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा मुंबई ३) | | |
| | (२) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५. | | |
| | (३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१. | | |
| | (४) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८. | | |
| | (५) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६. | | |
| | (६) महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१. | | |
| | (७) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६. | | |
| | (८) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९. | | |
| | (९) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०. | | |
| | (१०) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०. | | |

परिशिष्ट —" ब " (पुढे चालू)

[ नियम ११ (३) पहा ]

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | (११) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१. | | |
| | (१२) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५८. | | |
| | (१३) मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६. | | |
| | विभाग १.–(ब) केंद्रीय अधिनियम | | |
| | (१) भूमि संपादन अधिनियम. | | |
| | (२) भारतीय दंडसंहिता (प्रकरणे-पाच अ, सहा, आठ, नऊ, चौदा, पंधरा, सोळा, सतरा आणि एकवीस). | | |
| | (३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७. | | |
| | (४) संस्था नोंदणी अधिनियम, १८६०. | | |
| | (५) धर्मादाय दान निधी अधिनियम, १८९०. | | |
| | (६) शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३. | | |
| | (७) महाप्रशासक अधिनियम, १९६३. | | |
| | विभाग २.–" अधिवास " या संज्ञेच्या विशेष संदर्भासह आंतरराष्ट्रीय कायद्याची तत्त्वे. | | |
| प्रश्नपत्रिका तीन | शासकीय विवाद ; अभिहस्तांतरण पत्रलेखन यांच्या विशेष संदर्भासह शिरस्ता व कार्यपद्धती. | ३ तास | १०० |
| | विभाग १.– | | |
| | (क) शासकीय विवादासंबंधीच्या कायद्याच्या तरतुदींच्या विशेष संदर्भासह सर्वसाधारण शिरस्ता व कार्यपद्धती, विशेष विनंतीचा तपशील आणि शासनाला असलेली बचाव करण्याची मुभा. | | |
| | (ख) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ५२, २२६ आणि २२७ या खालील प्राधिलेखांचे स्वरूप व व्याप्ती. | | |
| | (ग) विधी अधिकारी नियम. | | |

परिशिष्ट —" ब " (समाप्त.)

[नियम ११ (३) पहा]

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | विभाग २.—दिलेल्या तथ्य संचावर आधारित युक्तीवादांचे प्रत्यक्ष मसुदालेखन. | | |
| | विभाग ३.—संविदा, मालमत्ता, मुद्रांक व नोंदणी यांसंबंधीच्या कायद्याच्या संबद्ध तरतुदींच्या विशेष संदर्भासह अभिहस्तांतरण-पत्र लेखनाचा शिरस्ता तसेच, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, भाडेपट्टे, गहाणे, विश्वस्त व्यवस्था-प्रतिज्ञापन, धनरोखे, प्रतिभूती बंधपत्र, क्षतिपूर्ती, हमी, इत्यादी यांसारख्या विभिन्न प्रकारच्या दस्तऐवजांचे प्रत्यक्ष मसुदालेखन आणि सामान्यतः त्यातील विभिन्न अभिहस्तांतरक किंवा तरतुदी. | | |

सर्व प्रश्नपत्रिकांमधील सर्व विषयांच्या परीक्षेसाठी पुस्तकांचा वापर करण्याची परवानगी राहील.

## परिशिष्ट —"क"

(नियम १६ पहा)

विधी व न्याय विभागातील सहायक (विधी) या पदावरून अधीक्षक (विधी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना.

### भाग एक

१. अर्जदाराचे नाव (संपूर्ण नाव)

२. विभाग

३. सहायक (विधी) या पदावर सातत्याने सेवा करीत असल्याचा दिनांक

४. सहायक (विधी) या पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष

५. अर्जदार कोणत्या वर्षी परीक्षेस बसू इच्छितात

६. नियम १५ अन्वये अर्जदारांना सूट मिळाली असल्यास, खालील मुद्यांबाबत माहिती द्यावी

(अ) परीक्षेला बसल्याचे वर्ष

(ब) आसन क्रमांक

(क) कोणत्या प्रश्नपत्रिकेत सूट मिळाली आहे

(ड) मिळालेल्या गुणांची टक्केवारी

दिनांक    अर्जदाराची सही

---

**(उमेदवाराच्या विभागाच्या उपयोगाकरिता)**

### भाग दोन

अर्जदाराने भाग एक मधील बाब क्रमांक ३, ४ व ६ मध्ये दिलेली माहिती तपासली आणि ती बरोबर असल्याचे आढळले.

क्रमांक————    कार्यासन क्रमांक/कार्यासन अधिकारी.

दिनांक————

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. ल. आचलिया,**

शासनाचे प्रधान सचिव व विधी परामर्शी.

१२/श्रावण ३, शके १९३४

री) या पदावर पदोन्नती
र्जाचा नमुना.

अर्जदाराची सही

तपशीली आणि ती बरोबर

ार्यासन अधिकारी.

ादेशानुसार व नावाने,

आचलिया,
सचिव व विधी परामर्शी.

क्रमांक आरटीआर.१०९८/२२२३/प्र.क्र. २६५(भाग-दोन)/का.–दोन.

विधी व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १९ जुलै २०१२.

प्रति

राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-एक, मुंबई.
महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-एक, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-दोन, नागपूर.
महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-दोन, नागपूर.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (२ प्रती) (पत्राने).
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई (२ प्रती)
सह सचिव, विधी व न्याय विभाग, नागपूर/औरंगाबाद.
सामान्य प्रशासन विभाग (का.१२).
सर्व अधिकारी, सर्व शाखा/कार्यासने, विधी व न्याय विभाग.

वि. ल. आचलिया,
शासनाचे प्रधान सचिव व विधी परामर्शी.

प्रत-निवड नस्ती (कार्यासन-२)

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 19th July 2012

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR.1098/2223/C.R. 265(Part-II)/Desk-II.—In exercise of the powe conferred by the proviso to article 309 of the constitution of India and i suppression of all existing rules and orders issued in this behalf, and i force in the State or any part thereof, the Governor of Maharashtra i hereby pleased to make the following Departmental Examination rules fo promotion to the post of the Superintendent (Legal) from the post Assistant (Legal), in the Law and Judiciary Department of the Governme of Maharashtra, namely :—

1. *Short title and commencement.*—(*1*) These rules may be called th Departmental Examination rules for promotion to the post Superintendent (Legal), from the post of Assistant (Legal) Rules, 2012.

(2) These rules shall come into force on the date of publication in th *Official Gazette.*

2. *Definition.*— In these rules, unless the context otherwis requires,—

(*a*) " Appendix " means an Appendix appended to these rules ;

(*b*) " Assistant (Legal) " means a person appointed to the post Assistant (Legal), in the Law and Judiciary Department of th Government of Maharashtra ;

(*c*) " Department " means the Law and Judiciary Department of th Government of Maharashtra ;

(*d*) " Examination " means Departmental Examination for promotio to the Post of Superintendent (Legal) from the post of Assistant (Lega in the law and Judiciary Department held according to the syllab prescribed under rule 11 read with Appendix 'A' and 'B' ;

(*e*) " Existing rules " means the rules and order relating to th Departmental Examination for promotion to the post of Superintende (Legal) from the post of Assistant (Legal) in force immediately befo the commencement of these rules ;

(*f*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*g*) " Superintendent " means the Superintendent (Legal), in legal section of the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra.

3. *Eligibility*.—For being eligible to appear for the examination, an Assistant (Legal) must have passed the post Recruitment Training Examination prescribed for Assistant (Legal) and must have also completed five years continuous service as an Assistant (Legal).

4. *Period and number of chances.*—(*1*) Subject to the provisions of rule 3, every Assistant (Legal) shall be required to pass the examination within nine years of his continuous service as an Assistant (Legal) and within three chances ;

(2) Any chance which Assistant (Legal) may have already availed of under the existing rules shall be counted towards the computation of total number of chances to be availed under these rules ;

Provided that the Assistant (Legal) who belongs to the Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes or Nomadic Tribes, shall be allowed to pass the examination within ten years of his continuous service as an Assistant (Legal) and within four chances.

5. *Consequences of failure to pass examination.*—Any Assistant (Legal) who fails to pass the examination within the time limit and chances specified in rule 4, shall lose the seniority, for the purpose of promotion to the post of Superintendent and shall rank below all the Assistant (Legal) who pass the examination before him and also below all those who are senior to such Assistant (Legal) below whom he is placed and who may pass the examination after him but within the period and chances specified in rule 4.

6. *Examination when to be held.*—The examination shall ordinarily be held once in a year in the month of November or December alongwith the examination for promotion on the posts of Desk Officer which are conducted by the General Administration Department. The examination shall be conducted either in Marathi or in English or in both the languages.

7. *Consequences when examination not held.*—If for any reason, the examination is not held in any particular year, then that year shall be excluded in computing the period specified in rule 4.

8. *Chances for appearing for examination.*—Subject to provisions of rule 5, an Assistant (Legal) can avail of any number of chances for appearing for the examination.

9. *Appointment of superintendent.*—No person shall be appointed to the post of Superintendent in the Subordinate Secretariat Service, unless he has passed the examination or has been exempted from passing the examination under rule 10.

10. *Exemption.*—The following persons shall be exempted from passing the examination, namely,—

(*a*) Assistant (Legal), who have passed the examination under the existing rules ;

(*b*) Assistant (Legal), who have already been exempted from passing the examination under the existing rules ;

(*c*) Any Assistant (Legal), who is eligible for appearing for the examination under rule 3, on or after the commencement of these rules, when the Assistant (Legal) attains age of forty-five years :

Provided that, he shall not regain his seniority which he has already lost as per rule 5.

11. *Syllabus.*—(*1*) The examination shall be held into two parts namely :—

Part (I).—Subjects common for the examination for promotion on the posts of Desk Officer conducted by the General Administration Department, and

Part (II).—Specific subjects about legal working in the Department.

(*2*) The syllabus, duration and maximum marks in each paper of Part I of the examination shall be as shown in Appendix 'A' or such other subjects as the Government may direct by an order, from time to time.

(*3*) The Part II of the examination shall consist of three papers each carrying 100 marks. These papers shall be on subjects specifically regarding legal work in the Department. The syllabus, duration and maximum marks in each paper of Part II of the examination shall be as shown in Appendix 'B' or such other subjects as the Government may direct by an order, from time to time.

(*4*) The arrangement for holding examination in Part I shall be made by the General Administration Department and in Part II shall be made by the Department under the directions of the General Administration Department. The final result of the examination shall be declared by the General Administration Department, and communicated it to the Department.

12. *Standard for passing of examination.*—The standard for passing the examination shall be fifty per cent of the total marks in each paper.

13. *Grace marks.*—In case of candidates who secure fifty per cent or more of the total marks prescribed for the whole examination, but fail to obtain fifty per cent marks in not more than two individual papers, maximum seven grace marks shall be given to them in those subjects, if thereby they are able to pass the examination. This facility shall also be admissible to those candidates who have secured exemption in their previous attempts.

14. *Special Merit.*—Where an Assistant (Legal), who passes the examination in the first attempt and secures seventy per cent or more marks in any paper, an entry regarding his performance in that paper shall be recorded in his confidential Record.

15. *Exemption in subjects.*—An unsuccessful candidate in any examination, who has secured fifty-five per cent marks or more in any paper, shall be exempted from appearing and passing again in that paper in his subsequent attempts.

16. *Application for examination.*—The year during which any Assistant (Legal), desire to appear for the examination, he shall apply in the format prescribed in Appendix 'C' and address it to Secretary, General Administration Department through principal Secretary, Law and Judiciary Department before 1st August of the desired year.

## APPENDIX '*A*'

[*See* rule 11(2)].

Syllabus for the Departmental Examination for promotion to the posts of Superintendents (Legal) from the post of Assistants (Legal) in the Law and Judiciary Department.—

| Paper No. (1) | Subjects (2) | Duration of Paper (3) | Marks (4) |
|---|---|---|---|
| I | (*a*) Constitution of India.<br>(*b*) Legislature Manual and Rules.<br>(*c*) Maharashtra Public Service Commission Rules and Regulations. | Three Hours. | 100 |
| II | (*a*) Conduct, Discipline and Appeal Rules read with the Manual of Departmental Enquiries.<br>(*b*) Recruitment Rules.<br>(*c*) Noting and Drafting. | Three Hours. | 100 |
| III | (*a*) Maharashtra Civil Services Rules<br>(*b*) Budget Manual.<br>(*c*) Bombay Financial Rules, 1969 [Chapters I, II, VII, IX, XI and XII excluding item (VII)].<br>(*d*) The Bombay Contingent Expenditure Rules, 1959 (excluding sections IX, X, XII, XIII, XIV, XVIII, (1)(5)(9)(10), XX(1), XXI, XXV, XXVI(1) and (3), XXVIII, XXX, XXXI, XXXII, XXXIII. | Three Hours. | 100 |
| IV | (*a*) Secretariat Instructions.<br>(*b*) Rules of Business (Excluding the First Schedule).<br>(*c*) Instructions issued under the Rules of Business.<br>(*d*) Manual of Office Procedure.<br>(*e*) Rules for the Treatment and Safeguarding of Classified Information and Papers. | Three Hours. | 100 |

*Note*.—Papers I and II excluding Noting and Drafting and III shall be with Books.

## APPENDIX 'B'

[*See* rule 11(3)]

Extract of Syllabus for the Departmental Examination for promotion to the posts of Superintendents (Legal) from the cadre of Assistant (Legal) in the Law and Judiciary Department of the Government.—

| Question Paper No. (1) | Subjects (2) | Duration of Paper (3) | Marks (4) |
|---|---|---|---|
| Paper-I | Interpretation of Statutes and the Constitution<br>Section I—Interpretation of Statutes<br>Section II—The Constitution of India.<br>Section III—Comparative Study of the American, Canadian and Australian Constitutions. | Three Hours | 100 |
| Paper-II | Special Laws<br>*Section I—State Acts*<br>(1) The Bombay Municipal Corporation Act, (Bom. III of 1888).<br>(2) The Maharashtra Municipalities Act, 1965.<br>(3) The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.<br>(4) The Bombay Village Panchayats Act, 1958.<br>(5) The Maharashtra Land Revenue Code, 1966.<br>(6) The Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961.<br>(7) The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.<br>(8) The Maharashtra Rent Control Act, 1999.<br>(9) The Maharashtra Co-operative Societies Act, 1960.<br>(10) The Bombay Public Trusts Act, 1950. | Three Hours | 100 |

APPENDIX 'B'
[*See* rule 11(3)]

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| | (11) The Bombay Police Act, 1951.<br>(12) The Bombay Sales Tax Act, 1958.<br>(13) The Bombay Industrial Relations Act, 1946.<br>*Central Acts*<br>(1) The Land Acquisition Act.<br>(2) The Indian Penal Code, Chapters V-A, VI, VIII, IX, XIV, XV, XVI, XVII and XXI.<br>(3) The Industrial Disputes Act, 1947.<br>(4) The Societies Registration Act, 1860.<br>(5) The Charitable Endowments Act, 1890.<br>(6) The Official Trustees Act, 1913.<br>(7) Administrators General Act, 1963.<br>*Section II*—The Principales of International Law with Special Refernece to "Domicile". | | |
| Paper-III | Practice and Procedure with special reference to Government Litigations; Conveyancing.<br>*Section I*<br>(*a*) Practice and procedure in general with special reference to the provisions of law concerning Government Litigation, particulars, special places and the defence open to Government.<br>(*b*) Nature and scope of writes under articles 52, 226 and 227 of the Constitution of India.<br>(*c*) Law Officers Rules.<br>*Section II*—Actual drafting of pleadings upon a given set of facts. | Three Hours | 100 |

APPENDIX 'B'

[*See* rule 11(3)]

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| | *Section III*—Practice of Conveyancing with special reference to the relevant provisions of the law of contracts, property, stamps and registration as also actual drafting of different kinds of documents such as conveyances, assignments, leases, mortgages, settlements, declaration of Trusts, money bonds, security bonds, indemnities, guarantees etc., and the different conveyances or provisions usually appearing therein. | | |

The examination of all subjects in all the papers shall be with books.

## APPENDIX 'C'

(*See* rule 16)

Form of application for admission to Departmental Examination to the post of Superintendent (Legal) from the cadre of Assistant (Legal) in Law and Judiciary Department

Part-I

(1) Name of the Applicant :

(2) Department :

(3) Date of commencement of continuous service on the post of Assistant (Legal) :

(4) Year of passing the Post Recruitment Training Examination for Assistant (Legal) :

(5) Year in which applicant intends to appear for the Examination. :

(6) Has the applicant secure exemption under rule 15, in any of the papers. :

If the answer is in affirmative, furnish the following particulars :—

(*a*) Year in which appeared for examination :

(*b*) Roll Number :

(*c*) Paper in which exempted :

(*d*) Percentage of marks obtained :

Date Signature of the Applicant.

---

(For use in the Candiadate's Department)

Part-II

Particulars furnished by the applicant at items 3, 4 and 6 of part I and have been verified and founds to be correct.

No. Desk Officer/Desk No. ...............

Date

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. L. ACHLIYA,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

No.RTR.1098/2223/C.R.265(Part-II)/Desk-II
LAW AND JUDICIARY DEPARTMENT
Madam Cama Marg
Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032
dated the 19th July 2012.

Copy forwarded to,—

The Secretary to the Governor of Maharashtra,

The Secretary to the Chief Minister of Maharashtra,

The Accountant General (Audit), Maharashtra Mumbai,

The Accountant General (Accounts and Entitlement), Maharashtra, Mumbai,

The Accountant General (Audit), Maharashtra, Nagpur

The Accountant General (Accounts and Entitlement), Maharashtra, Nagpur.

The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai (By letter) (5 Copies).

The Pay and Accounts Officer Mumbai,

The Resident Audit officer, Mumbai (2 copies),

The Joint Secretary, Law and Judiciary Department, Nagpur/ Aurangabad.

The General Administration Department (Desk-12)

All Officers, Desk and Branches in the Law and Judiciary Department.

V. L. ACHLIYA,
Principal Secretary and
Remembrancer of Legal Affairs.

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ६, अंक ११(२)] गुरुवार, फेब्रुवारी ६, २०२०/माघ १७, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०२०

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. २०१०/प्र.क्र. ५९३/का. दोन.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, विधि व न्याय विभागातील उप सचिव (विधि) (गट-अ), अवर सचिव (विधि) (गट-अ) आणि अधीक्षक (विधि) (गट-ब) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ या नियमामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " विधि व न्याय विभागातील उप सचिव (विधि) (गट-अ), अवर सचिव (विधि) (गट-अ) आणि अधीक्षक (विधि) (गट-ब) (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२० " असे संबोधण्यात यावे.

२. विधि व न्याय विभागातील उप सचिव (विधि) (गट-अ), अवर सचिव (विधि) (गट-अ) आणि अधीक्षक (विधि) (गट-ब) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ (यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) मधील नियम ४ मध्ये पोट-नियम (ब) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, पदोन्नतीद्वारे उक्त पदावर नियुक्तीकरिता योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध नसतील तर, ते पद, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) या संवर्गामध्ये तीन वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण करणाऱ्या सुयोग्य न्यायिक अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीवर बदली करून, भरण्यात येईल. ".

३. मुख्य नियमाच्या नियम क्र. ५ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" ५. " अधीक्षक (विधि) " या पदावरील नियुक्ती " सहायक (विधि) " हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर पाच वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून, सेवाज्येष्ठतेच्या आधारे पात्रतेनुसार सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ".

४. मुख्य नियमाच्या नियम क्रमांक ६ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" ६. नियम ४ पोट-नियम (ब) खंड (तीन) (उप खंड) (एक), (दोन), (तीन) आणि (चार) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर, आयोगाच्या मते, अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरित व्यक्तींसह), अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती (निरधिसूचित जमाती) किंवा भटक्या जमाती यांमधील उमेदवारांकरिता राखीव असलेली रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक त्या कालावधीचा अनुभव धारण केलेले उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नसतील तर, आयोगास, अशा निवडीच्या बाबतीत, आवश्यक असलेला अनुभवाचा कालावधी एक वर्षापर्यंत शिथिल करता येईल आणि या जातींमधील किंवा जमातींमधील योग्य उमेदवारांची निवड करता येईल. "

५. मुख्य नियमाच्या नियम ७ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" ७. नियम ४ मध्ये नमूद केलेल्या अवर सचिव (विधि) या पदावरील नियुक्ती ही, पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे ४०:६० या प्रमाणात करण्यात येईल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. ग. भागवत,

प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 30th January 2020.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 2010/C.R. 593/Desk-2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Deputy Secretary (Legal) (Group A), Under Secretary (Legal) (Group A), and Superintendent (Legal) (Group B), in the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2012 namely :—

1. These rules may be called the Deputy Secretary (Legal) (Group A), Under Secretary (Legal) (Group A), and Superintendent (Legal) (Group B), in the Law and Judiciary Department (Recruitment) (Amendment) Rules, 2020.

2. In the Rules 4 of the Deputy Secretary (Legal) (Group A), Under Secretary (Legal) (Group A), and Superintendent (Legal) (Group B), in the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2012 (hereinafter referred to as " the Principal Rules "), after sub-rule (b), the following proviso shall be added namely :—

" Provided that, if the candidates for appointment to the said post by way of promotion are not available, the post shall be filled in by transfer on deputation of a suitable Judicial Officer from the cadre of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, having not less than three years experience in that cadre."

3. For rule 5 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"5. Appointment to the post of Superintendent (Legal), shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Assistant (Legal), having not less than five years regular service in that post ".

4. For rule 6 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

" 6. Notwithstanding anything contained in Sub-Clauses (i), (ii), (iii) and (iv) of Clause (III) of sub-rule (b) of rule 4, if at any stage of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite period of experience are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to Scheduled Castes (including converts to Buddhism), Scheduled Tribes and De-notified Tribes or Nomadic Tribes, then the Commission may, in the matters of such selection, relax the requirement in respect of the period of experience upto one year and select suitable candidate belonging to such Castes or Tribes. ".

5. For rule 7 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"7. The Appointment to the post of Under Secretary (Legal) mentioned in the rule 4, by promotion, and nomination shall be made in ratio of 40:60 ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. G. BHAGWAT,
Principal Secretary and Remembrancer
of Legal Affairs.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.